नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १८२ Issue - 182 | वार मंगळवार दि. १९ नोव्हेंबर २०२४ Blow- Tuesday Date 19 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पारा घसरला; राज्यात थंडी वाढली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यामुळे राज्याच्या बहुतेक भागात किमान तापमानात घट झाली आहे. सोमवारी (१८ नोव्हेंबर) नगर येथे राज्यात सर्वांत कमी १२.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. पुढील काही दिवस थंडी कायम राहण्याचा अंदाज असून, राज्यात किमान तापमान १३ ते १५ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, हिमालयासह उत्तर भारतात पश्चिमी विक्षोप सक्रीय आहे. त्यामुळे श्रीनगरसह लेह, लडाखमध्ये बर्फवृष्टी सुरू झाली आहे. पंजाब, हरियाणासह दिल्ली परिसरात थंडीत वाढ झाली आहे. उत्तर भारत दाट धुक्यांचाही सामना करीत आहे. उत्तरेकडून राज्यात येणाऱ्या याच थंड वाऱ्यांमुळे राज्याच्या बहुतेक भागात किमान तापमानात घट झाली आहे. उत्तर महाराष्ट्रासह विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही किमान तापमानात घट झाली आहे. सध्या किमान तापमान सरासरीपेक्षा दोन ते तीन अंश सेल्सिअसने जास्त आहे. उत्तर महाराष्ट्रातील नगर जिल्ह्यात सोमवारी राज्यात सर्वांत कमी १२.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. त्यासह जळगावात १३.२, नाशिक १५.२ अंश सेल्सिअस तापमान होते. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगरमध्ये १४.४ आणि परभणीत १४.५ अंश सेल्सिअस तापमान होते. विदर्भातील गोंदियात १४.३, अकोल्यात १५.५, अमरावतीत १५.४, चंद्रपुरात १५.८, नागपूर १५.६, आणि वर्ध्यात १५.६ अशं सेल्सिअसवर पारा होता. मध्य महाराष्ट्रात पुण्यात पुणे १४.५, सांगली १८.७, कोल्हापूर १९.७ आणि महाबळेश्वरमध्ये १३.४ अंश सेल्सिअस किमान तापमान होते. दोन दिवसांपूर्वी दक्षिणेतून आलेल्या बाष्पयुक्त वाऱ्यामुळे दक्षिण महाराष्ट्रात किमान तापमानात वाढ झाली आहे. पुढील काही दिवसांत दक्षिण महाराष्ट्रातही पारा उतरण्याचा अंदाज आहे. दरम्यान, उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा प्रवाह कायम असल्यामुळे पुढील काही दिवस थंडी कायम राहण्याचा अंदाज आहे. राज्यातील किमान तापमान १३ ते १५ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. के. सानप यांनी व्यक्त केली आहे.

## मणिपूर हिंसाचार; केंद्र सरकार ॲक्शन मोडवर

### ‘सीएपीएफ’च्या ५० तुकड्या पाठवण्यात येणार; केंद्राचा मोठा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : गेल्या वर्षभरापासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत असल्याचं सातत्याने समोर येत आहे. हिंसाचाराच्या घटनेत अनेक लोकांना आपला जीव देखील गमवावा लागला आहे. मात्र, तरीही हिंसाचाराच्या घटना कमी होताना दिसत नाहीत. यातच आता पुन्हा एकदा मणिपूरमध्ये हिंसाचार उसाळला असून परिस्थिती चिघळली आहे. १५ नोव्हेंबर रोजी एक महिला आणि दोन मुलांचे मृतदेह सापडल्याची घटना समोर आली होती. त्यानंतर मणिपूरमध्ये पुन्हा एकदा जाळपोळीच्या घटना घडल्या आहेत.



एवढंच नाही तर १६ नोव्हेंबर रोजी संतप्त जमावाने काही आमदार आणि मंत्र्यांच्या घरावर हल्ला करण्याचा प्रयत्न करत गाड्याची तोडफोड केली. त्यामुळे पुन्हा मणिपूरमध्ये तणाव निर्माण झाला आहे. या सर्व घटनांची केंद्र सरकारकडून गंभीर दखल घेण्यात आली आहे. मणिपूरमधील हिंसाचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तातडीने बैठक घेतली. या बैठकीत सध्याच्या परिस्थितीबाबत चर्चा करत केंद्राने राज्यातील सुरक्षेची परिस्थिती लक्षात घेता केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या (उझक्र) ५,००० पेक्षा जास्त जवानांचा समावेश असलेल्या अतिरिक्त ५० तुकड्या मणिपूरला पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच सुरक्षा अधिकाऱ्यांची बैठक घेऊन गृहमंत्री अमित शाह यांनी निमलष्करी दलांना मणिपूरमधील शांतता आणि सुव्यवस्थेवर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देशही दिले असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने सूत्रांच्या हवाल्याने दिलं आहे. याबरोबरच मणिपूरमध्ये लवकरात लवकर शांतता प्रस्थापित आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणखी सुरक्षा दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची गरज भासल्यास आणि सुरक्षा रक्षक जवानांची गरज भासल्यास संख्या वाढवण्याचे निर्देशही देण्यात आल्याचं वृत्तात म्हटलं आहे.


मणिपूरमध्ये भारतीय जनता पक्षाला एक मोठा धक्का बसला आहे. मणिपूरमध्ये नॅशनल पीपल्स पार्टी (एनपीपी) आणि भाजपाची युती संपुष्टात आली आहे. नॅशनल पीपल्स पार्टीने बिरेन सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. तसेच कॉनराड संगमा यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल पीपल्स पार्टीने राज्यातील सध्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त करत हा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात पक्षाचे प्रमुख कॉनराड संगमा यांनी भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा यांना पत्र लिहून मणिपूरमधील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली आहे. तसेच सरकार सध्याची परिस्थिती हाताळण्याच्या पद्धतीवर असमाधानी असून निष्पाप लोकांचं नुकसान झाल्यामुळे सरकारचा पाठिंबा काढून घेत असल्याची घोषणा कॉनराड संगमा यांनी रविवारी केली.

## माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या गाडीवर दगडफेक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

काटोल : माजी गृहमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते अनिल देशमुख यांच्या वाहनावर सोमवारी रात्री अज्ञात इसमांनी दगडफेक केली. त्यात देशमुख गंभीर जखमी झाले असून त्यांना काटोल ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. नरखेड येथून प्रचारसभा आटोपून काटोलकडे परत जात असताना बेला फाट्यानजिक ही घटना घडली.

काटोल मतदार संघात अनिल देशमुख यांचे पूत्र सलील हे राष्ट्रवादीचे उमेदवार आहेत. प्रचाराच्या अखरेच्या दिवशी देशमुख दिवसभर मतदार संघात प्रचारात सक्रीय होते.



संध्याकाळी त्यांची नरखेडमध्ये सभा होती. ती आटोपून कार्यकर्त्यांसमवेत ते कारने काटोलकडे निघाले होते. या दरम्यान बेला फाट्याजवळ काही अज्ञात इसमांनी त्यांच्या गाडीवर दगडफेक केली. यात अनिल देशमुख हे गंभीर जखमी झाले असून त्यांना काटोलच्या रुग्णालयात नेण्यात आले आहे. या घटनेची चित्रफित समाजमाध्यमावर प्रसारित झाली असून त्यात देशमुख यांच्या चेहऱ्यावर जखमा दिसून येत आहेत. त्याच प्रमाणे त्यांच्या वाहनाच्या काचा फुटलेल्या दिसून येतात. या संदर्भात नागपूर ग्रामीण पोलिसांशी संपर्क साधला असता त्यांनी घटना घडल्याचे सांगितले. परंतु, अन्य तपशील देण्यास नकार दिला. दरम्यान, या घटनेची माहिती कळताच राष्ट्रवादीचे शेकडो कार्यकर्ते रुग्णालयाजवळ एकत्र झाले होते. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. भाजपने ही ‘स्टंटबाजी’ आहे, असा आरोप केला आहे. स्वत:च्याच कार्यकर्त्यांकडून देशमुख यांनी दगडफेक घडवून आणली, असा आरोप भाजपचे काटोल मतदार संघाचे प्रभारी अविनाश ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला आहे. काटोलमध्ये सलील देशमुख यांच्याविरुद्ध भाजपचे चरणसिंह ठाकूर यांच्यात अटीतटीची लढत आहे. मतदानाच्या दोन दिवसांपूर्वी ही घटना घडल्याने राजकीय वर्तूळात खळबळ उडाली. माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात वाद मागील काही वर्षांपासून सुरु आहे. देशमुख मंत्री असताना त्यांच्यावर झालेले खंडणीचे आरोपाला भाजपची फूस होती, असा आरोप देशमुख यांनी यापूर्वीच केला आहे.

## लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोल अमेरिकेत ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबईः कुख्यात गुंड लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोईला अमेरिकेत ताब्यात घेण्यात आले आहे. अनमोल अमेरिकेत असल्याची माहिती भारतीय यंत्रणांना मिळाल्यानंतर त्याला पकडण्यासाठी मुंबई पोलिसांनी अनमोल बिश्नोईच्या प्रत्यार्पणासाठी प्रस्ताव पाठवला होता. अनमोलला कॅलिफोर्नियामध्ये ताब्यात घेण्यात आले आहे. सलमान खानच्या घराबाहेरील गोळीबार प्रकरण आणि बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात अनमोल बिश्नोई सहभागी आहे.

राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) अलिकडेच अनमोल बिश्नोईची माहिती देणाऱ्याला १० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. एनआयएने अनमोल बिश्नोईविरुद्ध २०२२ मध्ये नोंदवलेल्या दोन प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल केले आहे. गेल्या महिन्यात, मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने विशेष मोक्का न्यायालयात अनमोलला भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती दिली होती.

वांद्रे परिसरातील अभिनेता सलमान खानच्या गॅलेक्सी अपार्टमेंटबाहेर १४ एप्रिल रोजी करण्यात आलेल्या गोळीबार प्रकणात लॉरेन्स आणि अनमोल बिश्नोईविरोधात गुन्हा दाखल आहे. अनमोल बिश्नोईने सलमान खानच्या घराबाहेर गोळीबारा केल्याच्या घटनेची जबाबदारी स्वीकारली होती. त्यानंतर त्याच्याविरुद्ध लुकआउट नोटीस जारी करण्यात आली होती.

## ईडीची मोठी कारवाई, २२ ठिकाणी छापे; तब्बल १२ कोटींची रोकड जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) पथकाने मोठी कारवाई केली आहे. ‘लॉटरी किंग’ सँटियागो मार्टिनच्या विरुद्ध मनी लॉड्रिंग प्रकरणात ईडी कारवाई तीव्र केली आहे. आज (१८ नोव्हेंबर) ईडीने सँटियागो मार्टिन आणि त्यांची कंपनी मेसर्स फ्यूचर गेमिंग अँड हॉटेल सर्व्हिसेस प्रा.लि. शी संबंधित तब्बल २२ ठिकाणी छापे टाकले आहेत. या कारवाईत ईडीने तब्बल १२.४१ कोटी रुपयांची रोकड जप्त केली आहे. तसेच ६.४२ कोटी रुपयांची एफडीआर गोठवण्यात आली आहे.

आज ईडीने तामिळनाडू, पश्चिम बंगाल, कर्नाटक, उत्तर प्रदेश, मेघालय आणि पंजाबसह आदी २२ ठिकाणी शोध मोहीम राबवत छापेमारी केली. यावेळी ईडीने कागदपत्रे, डिजिटल उपकरणे जप्त केली आ-हेत. याच कारवाई दरम्यान, ईडीने १२.४१ कोटी रुपयांची रोकड जप्त केली. तसेच ६.४२ कोटी रुपयांची एफडीआर गोठवण्यात आली. यासंदर्भातील वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने दिलं आहे.

दरम्यान, ‘लॉटरी किंग’ सँटियागो मार्टिनच्या विरुद्ध मनी लॉड्रिंग प्रकरणात ईडीकडून अनेकदा याआधीही कारवाई करण्यात आली होती. आजही ईडीने सँटियागो मार्टिन आणि त्याच्या काही कंपनीवर छापे टाकले. पीएमएलए २००२ च्या तरतुदीनुसार ईडीने ही कारवाई केल्याची माहिती सांगितली जात आहे. दरम्यान, मार्टिन हे १,३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे निवडणूक रोखे असलेले राजकीय पक्षांना सर्वात मोठे देणगीदार होते. मात्र, मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणून



त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली. तसेच ईडी २०१९ सून तामिळनाडूमध्ये या लॉटरी किंगची चौकशी करत आहे.

### सोलापूर जिल्ह्यासह धाराशिव लातूर व नांदेड जिल्ह्यातील निवडणूक खर्चाचा घेतला आढावा

### विशेष खर्च निरीक्षक बी आर बालकृष्णन

## निवडणूक यंत्रणांनी पुढील दोन दिवस खर्चाच्या अनुषंगाने कठोर कारवाई करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघासह महाराष्ट्र राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात मतदानाची प्रक्रिया होत आहे. या अनुषंगाने पुढील दोन दिवस सर्व निवडणूक यंत्रणांनी उमेदवाराच्या खर्चाच्या अनुषंगाने तसेच अवैध दारू, रोख रक्कम व अन्य अनुषंगिक बाबीवर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून कठोर कारवाई करावी, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाचे विशेष खर्च निरीक्षक बी. आर. बालकृष्णन यांनी दिले.

भारत निवडणूक आयोगाचे विशेष खर्च निरिक्षक बी. आर. बालकृष्णन यांनी सोलापूर, धाराशिव, लातूर व नांदेड जिल्ह्यांतील निवडणूक खर्च अनुषंगिक यंत्रणांचा आढावा



सोलापूर जिल्हाधिकारी कार्यलय येथे घेतला. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, खर्च निरिक्षक मीना तेजराम श्रीमनलाल(खठड) , खर्च निरिक्षक श्रीमती बी. ज्योती किरण (खठड), पोलीस आयुक्त एम. राजकुमार , उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, खर्च नोडल यांच्यासह आयकर विभाग, सेवा कर, राज्य उत्पादन शुल्क यासह वाहतूक विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

श्री. बालकृष्णन पुढे म्हणाले की, राज्यात निवडणूक काळात शेवटच्या काही तासांमधील प्रचारात गैर मार्गाने मतदारांना पैसे किंवा वस्तू वाटपाची तक्रार सी-व्हिजील, १९५० टोल फ्री क्रमांकावर मिळाल्यास त्यावर अत्यंत गतिमान पद्धतीने कार्यवाही करावी. तसेच या दोन्ही तक्रारीसाठी असणाऱ्या सुविधांबाबत नागरिकांनी सजग राहून मतदान प्रक्रिया पारदर्शक व न्याय वातावरणात पार पाडवी . सोशल मीडियावर जर कोणी अशा चुकिच्या प्रक्रियेचे व्हिडिओ पोस्ट केले तरी तो संदर्भ घेवून त्या ठिकाणी भरारी पथक पाठवा. पेड न्यूजबाबतही या काळात चांगल्या प्रकारे तपासणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

मतदानपूर्व ४८ तासात आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्यासाठी याकाळात वस्तू खरेदी, ऑनलाईन ट्रांजेक्शन, अवैध मद्य वाहतूक व खरेदी यासह रोख रक्कम वाहतूक याबाबत होणाऱ्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवा अशा सूचना भारत निवडणूक आयोगाचे विशेष

### सी-व्हिजील , १९५० टोल फ्री क्रमांकावरील अर्थिक व वस्तू वाटपांच्या तक्रारी गांभीर्याने घ्या

खर्च निरिक्षक बी. आर. बालकृष्णन यांनी दिल्या. सोलापूर जिल्हयाला आंध्र प्रदेश व कर्नाटक येथून येणाऱ्या अवैध मद्य वाहतुकोबाबत सीमेवरील यंत्रणेने लक्ष ठेवून ती सोलापूर शहरात दाखल होणारच नाही याची काळजी घ्यावी. सीमांवरील सर्व पथकांनी संशयित वाहनांची कसून तपासणी करण्याचे निर्देश विशेष खर्च निरिक्षक बी.आर. बालकृष्णन यांनी दिले.

तसेच पकडण्यात येणाऱ्या सर्व अवैध मद्य कोठून आले व कुठे जाणार राज्य व केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागांनी जास्त प्रमाणात वाटप साहित्यांची खरेदी झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात कर जमा होतो. तसेच विविध ठिकाणी अशा वस्तूंचे गोडावून असतात त्याठिकाणांवर छापे टाकून संशयित बाबींची तपासणी करावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या. प्रत्येक संशयित ऑनलाईन ट्रांझेक्शन तपासा निवडणूक काळात मोठ्या रकमांबरोबरच लहान लहान संख्येने जास्त ट्रांझेक्शन होत असल्याचे लक्षात आल्यास त्याबाबत तपासणी करा. कोणत्याही प्रकारे मतदारांवर परिणाम करणाऱ्या अर्थिक व्यवहार होणारच नाहीत यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कामे करण्याचे निर्देश श्री बी. आर. बालकृष्णन यांनी दिले. यावेळी राज्य उत्पादन शुल्क, आयकर विभाग, वाहतूक विभाग, वन विभाग व वस्तू कर विभाग यांनी निवडणूक काळात खर्चाच्या अनुषंगाने करत असलेल्या कार्यवाहीची माहिती घेऊन पुढील दोन दिवस अत्यंत सतर्क राहून काम करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात निवडणूक काळात खर्चाच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची अत्यंत सविस्तर माहिती दिली. पोलीस शहर आयुक्त राजकुमार यांनी सोलापूर शहर पोलीस आयुक्त कार्यालयाच्या हद्दीत निवडणूक काळात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देऊन त्यामध्ये २१ लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आल्याचे सांगून आदर्श आचारसंहिता भंगाच्या १४ तक्रारी अनुषंगाने गुन्हे दाखल केल्याचे त्यांनी सांगितले. तर अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी सोलापूर ग्रामीण पोलीस हद्दीत एक कोटी २८ लाखाची अवैध दारू साठा जप्त केल्याचे सांगून निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस यंत्रणा सतर्क असल्याचे त्यांनी सांगितले.

## संपादकीय....

### थंडीत वाढ

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, हिमालयासह उत्तर भारतात पश्चिमी विक्षोप सक्रीय आहे. त्यामुळे श्रीनगरसह लेह, लडाखमध्ये बर्फवृष्टी सुरू झाली आहे. पंजाब, हरियाणासह दिल्ली परिसरात थंडीत वाढ झाली आहे. उत्तर भारत दाट धुक्यांचाही सामना करीत आहे. उत्तरेकडून राज्यात येणाऱ्या याच थंड वाऱ्यांमुळे राज्याच्या बहुतेक भागात किमान तापमानात घट झाली आहे. उत्तर महाराष्ट्रासह विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही किमान तापमानात घट झाली आहे. सध्या किमान तापमान सरासरीपेक्षा दोन ते तीन अंश सेल्सिअसने जास्त आहे. उत्तर महाराष्ट्रातील नगर जिल्ह्यात सोमवारी राज्यात सर्वांत कमी १२.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यामुळे राज्याच्या बहुतेक भागात किमान तापमानात घट झाली आहे. नगर येथे राज्यात सर्वांत कमी १२.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. पुढील काही दिवस थंडी कायम राहण्याचा अंदाज असून, राज्यात किमान तापमान १३ ते १५ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. त्यासह जळगावात १३.२, नाशिक १५.२ अंश सेल्सिअस तापमान होते. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगरमध्ये १४.४ आणि परभणीत १४.५ अंश सेल्सिअस तापमान होते. विदर्भातील गोंदियात १४.३, अकोल्यात १५.५, अमरावतीत १५.४, चंद्रपुरात १५.८, नागपूर १५.६, आणि वर्ध्यात १५.६ अशं सेल्सिअसवर पारा होता. मध्य महाराष्ट्रात पुण्यात पुणे १४.५, सांगली १८.७, कोल्हापूर १९.७ आणि महाबळेश्वरमध्ये १३.४ अंश सेल्सिअस किमान तापमान होते. दोन दिवसांपूर्वी दक्षिणेतून आलेल्या बाष्पयुक्त वाऱ्यामुळे दक्षिण महाराष्ट्रात किमान तापमानात वाढ झाली आहे. पुढील काही दिवसांत दक्षिण महाराष्ट्रातही पारा उतरण्याचा अंदाज आहे. दरम्यान, उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा प्रवाह कायम असल्यामुळे पुढील काही दिवस थंडी कायम राहण्याचा अंदाज आहे. राज्यातील किमान तापमान १३ ते १५ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे.

## आचारसंहिता भंगाच्या ८,६६८ तक्रारी निकाली; ६६० कोटी १६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त

मुंबई : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते १८ नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण ८ हजार ६७८ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ८ हजार ६६८ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. सी-व्हिजिल ॲपद्वारे नागरिक आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत तक्रार दाखल करू शकतात. हे ॲप कोणत्याही पस्टोअरमधून डाउनलोड करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते. राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी १५ ऑक्टोबरपासून बेकायदा पैसे, दारू, अमली पदार्थ, मौल्यवान धातू आदींच्या विरोधात केलेल्या कारवाईत एकूण ६६० कोटी १६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. राज्यभर आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

# हर्षवर्धन पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करून मुंबईला पाठवा : शरद पवार

## भरणे यांना मी सर्व पदे दिली, भरणेचा रुपया खोटा निघाला, त्यांना पडायचं : शरद पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे : दि.१८/११/२४ महाराष्ट्रामध्ये शेती, शिक्षण व इतर ठिकाणी परिवर्तन करायचे आहे, त्यासाठी हर्षवर्धन पाटील यांच्या सारख्या सहकाऱ्यांची गरज असल्याने त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा. उद्या महाराष्ट्राची सत्ता आंम्हा लोंकाची हाती आल्यानंतर हर्षवर्धन पाटील यांचा मुक्काम इंदापूरला राहणार नाही मुंबईला राहील, असे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी भाषणात नमूद करीत आ.दत्तात्रय भरणे यांना मी सर्व काही दिले मात्र गडी कुठे गेला हे कळलं नाही.. ही कसली माणसे.. यांच्या पाठीला कणा नाही...भरणेचा रुपया खोटा निघाल्याने त्यांना निवडणूकीत पाडायचं.. पाडायचं.. पाडायचं... असा नारा देत शरद पवारांनी भाषणात आ. भरणेवर जोरदार टीकास्त्र सोडले.

इंदापूर येथे वाघ पॅलेस शेजारील भव्य मैदानावरती सोमवारी (दि.१८) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे व व महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांच्या प्रचाराच्या सांगता सभेत खा.शरद पवार यांनी मार्गदर्शन केले. या सभेला खा.सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.

शरद पावर पुढे म्हणाले, पक्षातील निर्णय मी घेत होतो. भरणेला सगळं दिलं आणि प्रसंग आला त्यावेळी कुठं गेला याचा पत्ताच नाही. निघून गेला. ही कसली माणसं आहेत? दम नाही ह्यांच्यात. ह्यांच्या पाठीला कणा नाही. संकटं येतात, त्याच्यावर मात करून उभं राहायचं, आणि भागातील जनतेचे जीवन सुधारेल यासाठी कष्ट करायचं, ह्याला म्हणतात नेतृत्व! पण भरणे हे खोटं नेतृत्व निघालं. हा रुपया खोटा निघाला. आणि रुपया खोटा असेल तर आता तो घेऊन चालणार नाही. उद्याच्या निवडणुकीत निकाल घ्यावा लागेल. काय निकाल घ्यायचा? भरणेला पाडायचं. हा निकाल तुम्ही घ्या, मी तुम्हाला खात्री देतो, इंदापूर तालुक्याचे चित्र बदलेल, असे शरद पवार यांनी भाषणात स्पष्ट केले.

आपल्या भाषणात हर्षवर्धन पाटील म्हणाले होते की, इंदापूरच्या कुस्तीला मला आशीर्वाद द्या. त्यावर बोलताना शरद पवार म्हणाले की, कुस्ती कुणाशीही करायची नसते, कुस्ती योग्य अशाच पैलवानाची करायची असते, असे नमूद करीत विरोधी उमेदवार आ.भरणे यांची पवार यांनी खिल्ली उडविली.



### गुजरातच्या उद्योगपतीला फोन करून भरणेचं कल्याण केलं : शरद पवार

**भरणे यांनी वाहतुकीच्या धंद्यामध्ये काम करण्याची इच्छा आहे मला मदत करा असे सांगितले, त्यावर मी फोन उचलून गुजरातच्या उद्योजकाला सांगितले व त्यांच कल्याण झालं. तसेच निवडणुकीला उभे राहताना मदत केली. जिल्हा परिषदेला, विधानसभेमध्ये मदत केली, मंत्रिमंडळात घेतलं. इंदापूर बरोबरच महाराष्ट्रामध्ये या प्रवृत्तीचे जे जे लोक आहेत त्यांना बाजूला करा, असे आवाहनही शरद पवार यांनी भाषणात केले.**

शरद पवार पुढे म्हणाले, इंदापूरचे चित्र बदलण्यासाठी स्व.शंकररावभाऊ पाटील त्यानंतर हर्षवर्धन पाटील यांना सरकारमध्ये काम करण्याचे संधी मिळाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्राच्या कल्याणासाठी शेतकरी, कष्टकरी, कामगार यांच्यासाठी काम केले.

राज्यात लोकांना बदल परिवर्तन पाहिजे. या मागणीला तुम्ही साथ द्या व हर्षवर्धन पाटलांना तुम्ही निवडून द्या. हर्षवर्धन हे वेगळ्या पक्षात होते मी वेगळ्या पक्षात होतो, मात्र महाराष्ट्राच्या हिताचा निर्णय घेताना आम्ही दोघांनी कधीही राजकारण आणलं नाही. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचा मी अध्यक्ष व समितीत हर्षवर्धन पाटील आहेत. आम्ही विविध प्रश्नावर चर्चा करतो. जबाबदारी कोणावर टाकायची असा प्रश्न पडतो त्यावेळेस दोन-तीन जणांचे नाव येते त्यामध्ये हर्षवर्धन पाटलांची नाव येते. हर्षवर्धन पाटील यांच्यामध्ये कोणतेही काम करण्याची दृष्टी आणि कुवत आहे, असे शरद पवार यांनी भाषणात स्पष्ट केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जी घटना लिहिली त्या घटनेवर देश एकसंध आहे. त्यात बदलाव करावा असा विचार केंद्रातील सत्तारूढ पक्षाच्या मनात होता. मात्र देशातील सर्व पक्षांनी एकत्र येऊन हा विचार म्हणून पडला. महाराष्ट्रातून अनेक उद्योग गुजरातला जात आहेत, त्यामुळे राज्यात बेरोजगारी वाढली आहे. राज्याला सर्व क्षेत्रात आघाडीवर नेण्यासाठी महाविकास आघाडी सरकारला निवडून द्या, असे आवाहनही शरद पवार यांनी यावेळी केले.

हर्षवर्षन पाटील म्हणाले, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत चांगला विचार पोहोचेल असे नाव म्हणजे शरद पवार. ८४ वयातही एखाद्या २१ वयाच्या युवकाला लाजवेल असा उत्साह त्यांच्यात आहे. राज्यात त्यांच्या सभेला प्रचंड गर्दी होतेय. आता नवीन फ्याड आले आहे रडायचं... जाता जाता त्यांना आपण दहा वर्षात वाईट केलं याची जाणीव झाली असावी, त्यामुळे रडायला आले असावे, असा टोला लगावला.

### इंदापूरच्या इतिहासात विक्रमी गर्दीची सभा!

ते पुढे म्हणाले, आमचे बरोबर इंदापूर तालुक्यातील सर्व समाजाचे लोक आहेत. आमच्यातील काही त्यांच्या पक्षात जाऊन मलिदा नंबर बी झाली आहे. आयाराम गयाराम किती आले गेले तरी हर्षवर्धन पाटील एकता पडलेला नाही, जनता माझ्या पाठीशी आहे. शरद पवारांचा विश्वास इंदापूरच्या जनतेवर आहे म्हणून मला पार्लमेंटरी बोर्डात घेतले. इंदापूर तालुका परिवर्तन करण्याच्या भूमिकेत आला आहे. ही सांगता सभा विरोधकांची राजकारणात मी सांगता करणारी सभा आहे. निवडणुकीनंतर शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडवायचा आहे. आर्थिक बदल घडवायचा आहे. तालुक्यासाठी पंचसूत्री कार्यक्रम राबवणार असून, प्रत्येक वर्षाला काय करणार याचा मास्टर प्लॅन तयार करणार असून

पुढच्या चार पिढ्यांचा शेतीचा प्रश्न सोडवल्याशिवाय हर्षवर्धन पाटील शांत बसणार नाही हा शब्द देतो. येत्या २३ तारखेला निकाल लागू द्या एक महिन्यात प्रशासन कसं सुधारायचा ती जबाबदारी हर्षवर्धन पाटील स्विकारायला तयार आहे, असे हर्षवर्धन पाटील यांनी नमूद करताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

यावेळी खा.सुप्रियाताई सुळे यांनी भाषण सांगितले की, इंदापूर-बारामतीतील दडपशाही आपणास मोडून काढायची आहे. मला आजींनी शिकवले रडायचं नसतं तर लढायचं असतं, ते कॉन्टॅक्टर साठी रडले असतील. चालु निवडणुक ही अस्मिता व स्वाभिमानाची लढाई आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी, दुधाला भाव मिळालाच पाहिजे यासाठी मी आग्रही राहणार आहे. आपले संस्कारक्षम उमेदवार हर्षवर्धन पाटील यांना निवडून द्या, असे आवाहन सुप्रियाताई सुळे यांनी भाषण केले. यावेळी अनेक मान्यवरांची भाषणे झाली. या सभेला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरचंद्र पवार पक्ष, काँग्रेस, शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) या पक्षाचे इंदापूर तालुक्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. इंदापूर तालुक्याच्या इतिहासातील विक्रमी सभा झाल्याची चर्चा सभेनंतर सुरु होती.

### सभेला मार्केट कमिटीची जागा मुद्दाम दिली नाही : अँड.तेजसिंह पाटील

**शरद पवार व सुप्रियाताई सुळे यांच्या आजच्या सभेला मार्केट कमिटीची जागा मुद्दाम देण्यात आली नाही. मी संबंधितांना ३ वेळा फोन केले, एकदा जाऊन भेटलो मात्र सभेसाठी जाणून-बुजून जागा दिली नाही. या घटनेचा मी निषेध करतो असे भाषणात पक्षाचे तालुकाध्यक्ष अँड. तेजसिह पाटील यांनी सांगितले.**

# मतदान व मतमोजणीच्या दिवशी जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केल्यानुसार सोलापूर जिल्ह्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी मतदान (२० नोव्हेंबर) व मतमोजणी (२३ नोव्हेंबर) या दोन्ही दिवशी सोलापूर जिल्ह्यातील ज्या ठिकाणी आठवडी बाजार भरणार आहे, अशा सर्व ठिकाणी बाजार पूर्णवेळ बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

जिल्ह्यात बार्शी तालुक्यातील वैराग, उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी, नंदुर, दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग, शिंगडगाव, मंद्रुप येथील वडापूर, विंचूर, अक्कलकोट तालुक्यातील उडगी, चिक्केहळ्ळी, बोरगाव, सुलेरजवळगे, शावळ, हन्नुर, माढा तालुक्यातील चांदज, मोहोळ तालुक्यातील पाटकुल, शेटफळ, चिंचोलीकाटी, कोन्हेरी, करमाळा तालुक्यातील नेरले, जिंती, कंदर, वाशिंबे, पंढरपूर तालुक्यातील त. शेटफळ, सोनके, सरकोली, जळोली, पटवर्धन कुरोली, माळशिरस तालुक्यातील नातेपुते, महाळुंग, पाणीव तसेच सांगोला तालुक्यातील मेडशिंगी, किडेबिसरी, नराळे, हंगिरगे, हातीद, कडलास, नवी लोटेवाडी, अजनाळे, भोसे या ठिकाणचा बुधवार दि.२० नोव्हेंबर रोजी मतदाना दिवशी बाजार बंद राहतील.

तसेच जिल्ह्यात बार्शी तालुक्यातील बार्शी, घारी, श्रीपत पिंपरी, उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमन, दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी, मंद्रुप येथील बरूर, कंदलगाव, औज, अक्कलकोट तालुक्यातील तोळणूर, जेऊर, कर्जाह, शिरवळ, माढा तालुक्यातील मोडनिंब, टाकळी टे, मोहोळ तालुक्यातील पापरी, देवडी, सय्यद वरवडे, कोन्हेरी, करमाळा तालुक्यातील केत्तुर, पंढरपूर तालुक्यातील बोहाळी, उंबरगांव, पुळूज, माळशिरस तालुक्यातील वेळापूर, सांगोला तालुक्यातील आलेगाव, वाटंबरे, मानेगांव, पाचेगांव (खुर्द),मंगळवेढा तालुक्यातील लवंगी, अरळी, नंदेश्वर, मरवडे या ठिकाणचा शनिवार दि.२३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी दिवशी बाजार बंद राहतील.

नगरपरिषद, नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामीण स्तरावर भरणाऱ्या आठवडी बाजाराच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने मतदानाच्या व मतमोजणीच्या दिवशी आदर्श आचारसंहितेचे पालन होण्याचे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने मार्केट अँड फेअर क्ट अधिनियम, १८६२ चे कलम ५ (ग) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दि. २० व २३ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

# निष्ठेच्या मुद्द्या भोवती फिरत आहे धाराशिव कळंब विधानसभा मतदारसंघाची निवडणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे : धाराशिव कळंब २४२ विधानसभा मतदारसंघात एकूण बारा उमेदवार निवडणूक रिंगणात असून प्रमुख लढत महाविकास आघाडी कडून शिवसेना उभाठा पक्षाचे उमेदवार विद्यमान आमदार कैलास घाडगे पाटील व महायुती कडून शिवसेना शिंदे पक्षाचे अजित पिंगळे व वंचित बहुजन आघाडीचे ड, प्रणित भैया ढिकले व मनसे चे देवदत्त मोरे यांच्यात होत असुन मतदार संघामध्ये प्रचार यंत्रणा जोरदार चालू असुन २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठीच प्रचार अंतिम टप्प्यात आहे. महाविकास आघाडी व महायुती यांच्या उमेदवारास जोरदार लढत होत असून दोन्ही बाजूकडून प्रचारात कसलीच कसर राहू नये त्याचा प्रयत्न केला जात असून प्रत्येक गावातून डोअर टू डोअर प्रचार तसेच रॅली याद्वारे मतदारांना मतदान देण्याचे आवाहन करण्यात येत असून. निवडणूक निष्ठेच्या मुद्द्याभोवती





फिरत आहे. धाराशिव कळंब २४२ विधानसभा मतदारसंघात एकूण १२ उमेदवार निवडणूक रिंगणात असून प्रमुख लढत महाविकास आघाडी कडून शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार विद्यमान आमदार कैलास घाडगे पाटील व महायुतीकडून शिवसेना शिंदे पक्षाचे अजित पिंगळे यांच्यात लढत होत असून वंचित बहुजन आघाडीचे ड .प्रणित ढिकले उद्योजक देवदत्त मोरे या उमेदवारांनी ही प्रचार यंत्रणा निवडणुकीच्या रिंगणात जोर धरला असून विधानसभेचा प्रचार अंतिम टप्प्यात असून स्टार प्रचारकांच्या सभा मधून आरोप प्रत्यारोप होत आहेत. गत पाच वर्षात महाविकास आघाडीला अडीच वर्ष व महायुतीला अडीच वर्ष समसमान कालावधी मिळाला असून या कालावधीत विकासाची कामे आम्ही जास्त कशी केली हे पटऊन देण्याचे काम स्टार प्रचारक तसेच कार्यकर्ते करीत आहेत मोटार व्हॅन मधून एलसीडीच्या माध्यमातून विकासाच्या योजनेची चित्रफीत दाखवली जात आहे. महाविकास आघाडीचे ऊबाठा शिवसेना पक्षाचे उमेदवार विद्यमान आमदार कैलास घाडगे पाटील हे आपल्या सभेतून महाविकास आघाडी सरकार सत्तेवर असताना जनहिताच्या अनेक योजना राबविल्या विकासकामे केली परंतु महायुती सरकारने या विकास कामाला स्थगिती दिली यासाठी न्यायालयात जावे लागले. आहेत असे सांगत आहेत तर शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार अजित पिंगळे हे कमी कालावधीत सामान्य माणसास फायदेशीर असे निर्णय घेतले असल्याचे सांगत आहेत, बंडखोरीचा कमी परंतु नाराजी व पक्षांतराचा महायुती व महाविकास आघाडी यांना कमी अधिक फटका बसत स्टार प्रचारकांच्या सभा मधून आरोप प्रत्यारोप होत असून शिवसेना उबाठा पक्षाकडून शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांची धाराशिव येथील प्रचार सभा व खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या मतदारसंघात सभा रॅली होत आहेत तसेच शिवसेना शिंदे पक्षाकडून धाराशिव येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कळंब येथे मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे, खासदार, श्रीकांत शिंदे, आमदार राणाजगजीत सिंग पाटील, प्रचाराने निवडणुकीत रंगत वाढली असून, विजयासाठी उमेदवार प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत, या निवडणुकीत निष्ठेचा प्रश्न गाजत असून शिवसेना उबाठा पक्षाचे उमेदवार कैलास पाटील यांनी शिवसेना पक्ष फुटीच्या वेळी उद्धव ठाकरे यांच्यावर निष्ठा दाखवीत पक्ष सोडला नाही यामुळे निष्ठावंत उमेदवार म्हणून त्यांचा प्रचार केला जात आहे तर शिवसेना शिंदे पक्षाचे उमेदवार अजित पिंगळे हे भाजपचे तालुकाध्यक्ष असताना देण्यात आले आहे यामुळे त्यांच्या पक्षांतरामुळे निष्ठेचा मुद्दा मतदार संघात चर्चेत जरी असला तरी अजित पिंगळे हे बाल शिवसैनिक असून गत विधानसभेच्या निवडणुकी वेळी त्यांना पक्षाने उमेदवारी न दिल्याने त्यांनी बंडखोरी करून अपक्ष निवडणूक लढवली होती व पुढे त्यांनी भाजप पक्षात प्रवेश केला परंतु तीस वर्षे बाल शिवसैनिक असल्यापासून धनुष्यबाण याचा प्रचार मी करीत होतो व त्यावर माझा अधिकार आहे असा दावा करीत आहेत या निवडणुकीत उमेदवारीसाठी पक्षांतर झाली उमेदवारी अर्ज दाखल झाले इच्छुक म्हणून शिवसेना शिंदे पक्षाचे शिवाजी आप्पा कापसे, सुधीर अण्णा पाटील, नितीन लांडगे, सुरज महाराज साळुंखे, यांनी उमेदवारी अर्ज भरले व परत घेतले आहेत तर शिवसेना उबाठा पक्षाकडून मकरंद राजे निंबाळकर, यांनी भरलेला उमेदवारी अर्ज परत घेतला तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रताप सिंह पाटील काँग्रेस आणि पक्षाकडून पांडुरंग कुंभार यांनी उमेदवारी अर्ज परत घेतला यामुळे मतदार संघात बंडखोरी झाली नाही परंतु माजी नगराध्यक्ष संजय मुजरा यांनी आपल्या सहकार्य कार्यकर्त्यासमवेत शिंदे शिवसेना पक्षाचा त्याग करीत शिवसेना उबाठा पक्षात प्रवेश केला आहे गत पाच वर्षात महाविकास आघाडीला अडीच वर्षे व महायुतीला आठ वर्षे समसमान कालावधीत मिळाला असून या कालावधीत विकासाची कामे आम्ही जास्त कशी केली हे पटवून देण्याचे काम स्टार प्रचारक तसेच कार्यकर्ते करीत आहेत तसेच मधून एलसीडीच्या माध्यमातून विकासाच्या योजनेची चित्रफीत दाखवली जात आहे, महाविकास आघाडीचे ओबाटा शिवसेना पक्षाचे उमेदवार विद्यमान आमदार कैलास घाडगे पाटील हे आपल्या समय सभेमधून आघाडीचे सरकार सत्तेवर असताना जनहिताच्या अनेक योजना राबविल्या विकासकामे केली परंतु महायुती सरकारने या विकास कामांना स्थगिती दिली. यासाठी न्यायालयात जावे लागले. असे सांगत आहेत तर शिवसेना शिंदे पक्षाचे उमेदवार अजित पिंगळे हे कमी कालावधीत सामान्य माणसास फायदेशीर असे निर्णय घेतले असल्याचे सांगत आहेत. निवडणुकीत महाविकास आघाडी मशालीला ६१ हजाराचे मताधिक्य ही महाविकास आघाडी उमेदवाराची जमिनीची तर महायुती सरकारकडून लाडकी बहीण योजना प्रभावी रित्या राबविली गेल्यामुळे महायुती उमेदवराची जमिनीची बाजू आहे यामुळे प्रचारात रंगत वाढत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Daydev Sonakamble

■ प्रशासकीय कार्यालय : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ विभागीय कार्यालय : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### निवडणूक प्रक्रियेतील सुलभतेसाठी चक्रीका ॲपचा वापर बंधनकारक

पंढरपूर/प्रतिनिधी : निवडणूक प्रक्रियेत सुलभता आणि कार्यक्षमता वाढण्यासाठी



'चक्रीका ॲप'चा वापर बंधनकारक असून निवडणूक नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी गुगुल प्ले स्टोअर मधून चक्रीका ॲप डाऊन करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

'चक्रीका ॲप'द्वारे मतदान कर्मचाऱ्यांना मतदारांची तपशीलवार माहिती, मतदान केंद्रांचे निर्देश आणि प्रक्रियेतील आवश्यक सूचना सहज मिळतात. मतदानाच्या वेळी उद्भवणाऱ्या तांत्रिक समस्यांवर त्वरित तोडगा काढण्यासाठी तसेच मतदानाचे अह-वाल पाठविण्यासाठी हे ॲप उपयुक्त असून निवडणूक नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी तात्काळ या ॲपचा वापर करावा, असे आवाहनही निवडणूक निर्णय अधिकारी श्री. इथापे यांनी केले आहे.

# मंदिर समितीला कार्तिकी यात्रेत ३ कोटी ५७ लाखाचे उत्पन्न

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (ता.१७) माघी, चैत्री, आषाढी व कार्तिकी अशा चार प्रमुख यात्रा पंढरपुरात मोठ्या प्रमाणात भरत असतात. कार्तिकी यात्रेचा मुख्य सोहळा १२ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला. या यात्रा कालावधीत मंदिर समितीला विविध देणग्यांच्या माध्यमातून ३ कोटी ५७ लाखाचे उत्पन्न मिळाल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्रींच्या चरणाजवळ रू.४१४१३१४/- (रू.४०१५६६७/-), भक्तनिवास रू.४४४८५८१/- (रू.६६६२३७७/-), देणगी रू.११४६०३६२/- (रू.१२८९२३७१/-), लाडूप्रसाद रू.६०६४६२०/- (रू.६२४९०००/-), पूजा रू.१०७२६८१/- (रू.४०७०००/-) सोने चांदी भेट रू.५०४०१५/- (रू.८३६२५४/-), दानपेटी रु.७३५६१०४/- (रु.१५७२१५२७/-) व इतर



रू.६९९६४५/- (रू.९२४०७२/-) असे एकूण रू.३५७४७३२२/- (रू.४७७०८२६८/-) असा उत्पन्नाचा तपशिल आहे. कंसात मागील वर्षाची आकडेवारी आहे.

यामध्ये प्रामुख्याने सुमारे ६ लाख बुंदी लाडू प्रसादाची विक्री झाली आहे. तसेच देणगी व इतर रकमा जमा करून घेण्यासाठी ऑनलाईन सुविधेचा वापर करण्यात येत असल्याने, या यात्रेत २१ लाख ६९ हजार इतकी रक्कम ऑनलाईन पद्धतीने जमा झाली आहे. इतर जमेमध्ये भक्तनिवास, गोमूत्र, शेणखत, मोबाईल लॉकर, महा वस्त्र, चंदन पावडर, जमीन खंड व अनुषंगिक बाबींचा समावेश आहे.

मागील वर्षीपेक्षा १ कोटी १९ लाख इतकी उत्पन्नात घट झाली आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना पुरेशा प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या, या मिळालेल्या दानातून भाविकांना अत्याधुनिक व अधिकाधिक सोयी सुविधा उप-लब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न रा-हणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

# आचारसंहितेचा भंग केल्यास कठोर कारवाई होणार : पो.नि.गुरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड पोलीस स्टेशनच्या वतीने आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास गुन्हेगारावर कठोरात कठोर कारवाई होणार असल्याचे निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी सांगितले असून रात्रीतून कोंबिंग व ऑल आऊट मध्ये सर्च ऑपरेशन करून ५ लोकं स्थानबद्ध करण्यात आली,

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांचं अस्तित्व निफाड पो-लीस स्टेशन हद्दीत स्वीकारले जाणार नाही,निर्भय व निपक्ष मतदान प्रक्रिया पार पडावी या करिता आम्ही कठोरात कठोर कारवाई करण्यास प्रतिबद्ध असून, कोणत्याही पार्टीचा, पक्षाचा,संघटनेचा असेल त्यांनी आदर्श आचारसंहितेचा भंग केल्यास कारवाई होणार आहे. तसेच मतदारांणा आमिष दाखवून अनुचित प्रकार टाळण्यासाठी दक्षता पथक तयार करण्यात



आले असून, सोबत केंद्रीय रिझर्व्ह दलाचा फोर्स उठझऋ चे जवान सुद्धा तैनात करण्यात आले आहेत.

नागरिकांनी निर्भय राहून मतदान करावे,मतदानाला जा-ताना मतदान केंद्रापासून १०० मिटर च्या आत मोबाईल फोन घेऊन जाण्याची परवानगी नसुन, कोणीही कर्तव्यावरील वरील कर्मचारी यांच्याशी हुज्जत घालणार नाही.याची नागरिकांनी काळजी घ्यावी.असे अहवान निफाड पो-लीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी केले आहे.

# महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी व काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या जिल्हाध्यक्षपदी असलेल्या गणेश पाटील यांची हकालपट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या जिल्हाध्यक्षपदी असलेल्या गणेश पाटील यांची पदावरून अखिलपट्टी करीत पक्षातून निलंबित केले आहे असे पत्र प्रदेशाध्यक्ष महबूब शेख यांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेस चर्चेने पवार गटाच्या महाराष्ट्र राज्य यांनी काढले आहेत.

आपल्या पक्षाची भूमिका विरोधी भूमिका घेत असल्याने



अनेक तक्रारी प्राप्त झाल्याचे कारण त्या पत्रामध्ये दिले असून त्यामध्ये जिल्हाध्यक्ष पदावरून मुक्त करून आपल्याला फक्त तो निलंबित केले असल्याचे यामध्ये म्हटले आहे.

गणेश पाटील यांनी गेल्या दोन दिवसांपूर्वी येथील अपक्ष आमदार बबनदादा शिंदे यांचा मुलगा रंगीत शिंदे यांना पाठिंबा दिला होता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार महायुका आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजीत धनंजय पाटील हे माढा तालुक्यातून मैदानात आहेत.

गणेश पाटील यांनी गेल्या दोन दिवसांपूर्वी येथील अपक्ष आमदार बबनदादा शिंदे यांचा मुलगा रणजीत शिंदे यांना पाठिंबा दिला होता व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिषेक पाटील हे माळा तालुक्यातून मैदानात आहेत.

आज शरद पवार यांच्या टेंभुर्णी येथील सभेच्या अगोदर गणेश पाटील यांची पक्षा-तून हकालपट्टी करण्यात आली असल्याची पत्र काढण्यात आले आहे आमदार बबनराव शिंदे यांचे पोतराज शिंदे यांना अपक्ष उमेदवार म्हणून त्यांना गणेश पाटील यांनी पाठिंबा जाहीर केला आहे होता त्यानंतर पक्षातूनही कारवाई करण्यात आली आहे.

# सलगर भिमनगर येथे आ. कल्याणशेट्टी यांच्या प्रचारार्थ डोर टू डोर प्रचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सलगर भिमनगर येथे भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या प्रचारर्थ आज रिपाई सलगर शाखेच्या वतीने डोर टू डोर प्रचार करण्यात आला,

यावेळी सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी केलेले सलगर भिमनगर मध्ये केलेले विविध विकास कामाचे सर्व बांधवाना समजावून सांगण्यात आले.

यावेळी लोकांनी भरपूर प्रतिसाद दिले , यावेळी रिपाई ता सरचिटणीस राजु भगळे, जयभिम भगळे , राहुल समाणे, अनिल धसाडे, सिद्धार्थ समाणे, सचिन



शटगार,मारुती धसाडे,अंबादास भगळे, सचिन भगळे, श्रीसैल धसाडे,शिवानंद आरेनकेरी,भाग्यवंत जत्ती, संकेत माशाळे, रतीकांत पुटगे, व आदी उपस्थित होते

# मतासाठी पैसे वाटताना एक जण रंगेहाथ आढळला; विडी घरकुल मधील घटना

सोलापूर/प्रतिनिधी : शहरातील विधानसभा निवडणुकीच्या शिगेला प्रचार प्रचाराच सोमवारी सायंकाळी सांगता होत असून व मतदान केवळ दोन दिवसांवर येऊन ठेपले असताना तसेच कत्तल की रात ला एक दिवस अवकाश असतानाच रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास विडी घरकुल परिसरात एका विशिष्ट राजकीय पक्षाला मत द्यावे याकरिता पैसे वाटप करत असताना एका कार्यकर्त्यास नागरिकांनी रंगेहात पकडले आणि पोलिसाच्या ताब्यात दिले. रोहन सुनील सोमा (वय-२८,रा.योगेश्वर नगर,जुना विडी घरकुल) असे त्या रंगेहात पकडलेल्या तरुणाचे नाव आहे. १७ नोव्हेंबर रोजी घरकुल परिसरात असलेल्या गोकुळ नगर येथे मेमोरियल शाळेसमोर हा प्रकार उघडकीस आला. एम आयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस पथक पेट्रोलिंग करत असताना त्यांना ही बातमी कळली व त्यांनी त्या ठिकाणी जाऊन त्या इसमास ताब्यात घेत-ले तपासात संशयित आरोपीकडे एका पिशवीत वेगवेगळ्या लोकांची नावे लिहिलेला एक पांढरा कागद,८ खाकी लिफाफे, ८० हजार रुपये रोख रक्कम मिळून आल्या.पाचशे रुपये च्या १६० नोटा होत्या.ही घटना विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना कळल्यानंतर त्यांनी त्या ठिकाणी धाव घेतली.व संशयित आरोपीकडे विचारणा केली असता,प्रारंभी त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली.पोलिसांनी त्यास पकडून विचारले असता त्यांनी एका राजकीय पक्षासाठी आपण हे पैसे वाटत असल्याचे सांगितले.एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल अजित माने यांनी रोहन सोमा याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# मतदानासाठी ओळख पत्र किंवा अन्य बारा पुराव्या आवश्यक : निवडणुक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : दि २०.११.२०२४ रोजी लोहा विधानसभा मतदारसंघात ३ लक्ष १ हजार ६५० मतदार आपला मतदानाचा हक्क ३३८ मतदान केंद्रावर बजावणार आहेत.मतदारांनी मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी जाताना सोबत मतदार कार्ड न्यावे किंवा निवडणूक आयोगाने निर्धारित केलेले बारा पुराव्या पैकी एक पुरावा मतदान केंद्राध्यक्ष याना ओळख पटविण्यासाठी आवश्यक आहे .तेव्हा मतदारानी याची दक्षता घ्यावी असे आवाहन लोहा विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी केले आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.३ लक्ष १हजार ६५० मतदार असून त्यासाठी लोहा विधानसभा क्षेत्रात ३३८ मतदान केंद्र आहेत सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. मतदारांनी मतदानासाठी जा-ताना सोबत मतदान ओळखपत्र आणावे . मतदारांनी मतदान केंद्रावर ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने पर-वानगी दिलेल्या एकूण बारा पुराव्यापैकी (आधार कार्ड , पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट) यासह निर्धारित केलेले कोणतेही पुरावे सादर करावे मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा उप-लब्ध करून देण्यात आल्या आहेत,तसेच पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे

मतदारांनी शिस्तीत व निर्भयपणे मतदान करावे व मतदानाची टक्केवारी वाढवावी. असे निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी आव-ाहान केले आहे. तसेच मतदान करताना मतदान केंद्रावर कोणीही मोबाईल घेऊन जाऊ नये मतदान यंत्राचा फोटो काढू नये मोबाईल मध्ये शूटिंग करू नये जर केल्यास निवडणूक आयोगाच्या नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असेही

निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार,यांनी सांगितले. तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार विठ्ठल परळीकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार रामेश्वर गोरे, सहायक निवडणूक अधिकारी मुख्याधिकारी श्रीकांत लालगे यांनी मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले आहे.

**मी कर्तृत्व सिद्ध केल्याने जनता आमदार करेल : अभिजीत पाटील**

**महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ माढ्यात सांगता सभा संपन्न**

# दिल्लीपतींसमोर हुजरेगिरी करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवा : नितीन बानगुडे पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ माढा येथे नितीन बानगुडे पाटील यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्षाचे प्रमुख नेते मंडळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना नितीन बानगुडे पाटील म्हणाले की कोरोना काळात महाविकास आघाडीने चांगले काम केले. मात्र पक्ष फोडीचे राजकारण करून महाराष्ट्रातील सर्व प्रकल्प गुजरातला नेऊन महायुती सरकार दिल्ली पती समोर हुजरेगिरी करण्याचे काम करत आहे. सर्व प्रकल्प बाहेर गेल्याने येथील तरुण बेरोजगार झाला आहे. शेतमालाला भाव नाही. राज्यात शेतकरी आत्महत्या करत आहेत. महागाई वाढली आहे.

यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की राज्यात पवार




साहेबांच्या मार्गदर्शनाखाली महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. यामुळे मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी येथील जनतेने मला साथ द्यावी. असे आ-वाहन करत त्यांनी येथील लोक पवार साहेबांना सोडून गेले. त्यांना तिकीट नाकारल्यानंतर पवार साहेबांवर आरोप करत आहेत. जरांगे पाटलांवर आरोप केला. समाजाच्या भावना दुखावल्या. त्यांना तुम्ही मतदान करणार का असा सवाल उपस्थित करत विरोधकांकडे विकासाचे व्हिजन नाही. फक्त उस-नेला म्हणजे विकास झाला अस नाही. मी कोरोना काळात आर्थिक नुकसान करून नागरिकांसाठी काम केले. बंद पडलेला कारखाना सुरू करून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ दिले. मात्र समोरच्या उमेदवाराने दूध संघ बंद पाडला. दुधाचा भाव पाडला. त्याच्या जमिनी विकल्या, शेतकऱ्यांच्या उताऱ्यावर कर्ज काढून शेतकऱ्यांना देसोधडीला लावले. मात्र मी शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून काम केल्याने जनता मला साथ देत आहे. मी आमदार झाल्यावर माढ्याचा पाण्याचा प्रश्न सोडवेन, सीना माढा प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू करेन, माढ्यात नागरी सुविधा उप-लब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करेन. आरोग्याची, शिक्षणाची सोय तसेच

**सर्वांना सोबत घेऊन जाणारे अभिजीत पाटील यांना साथ द्या : नितीन बानगुडे पाटील**

युवकांसाठी प्रशस्त जिम उभारण्यात येईल, माढ्यात गणपतराव साठे यांचे भव्य स्मारक उभारण्यात येईल, युवकांना नोकरी मिळावी यासाठी एमआयडीसी उभारण्यात येईल, रस्ते चकाचक करण्याचे काम करेन, मतदार संघात सर्व ठिकाणी महापुरुषांची स्मारके उभारण्यात येतील असा विश्वास देत मी विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून काम करत आहे. ही निवडणूक आमदार पुत्राविरुद्ध शेतकऱ्यांचा मुलगा अशी आहे. ते अनेक अफवा पसरवतील मात्र येथील जनता दोघांचीही तुलना करून मतदान करेल असा विश्वास व्यक्त केला.

ते पुढे बोलताना म्हणाले की विरोधक दादांच्या पुण्याईवर निवडून देण्याची आवाहन करत आहेत तर माझ्या घराण्याने पांडुरंगाची मूर्तीचे संरक्षण केली आहे. मी कर्तृत्व सिद्ध केल आहे. म्हणून मला लोकांनी स्वीकारल आहे. येथील जनता मला सेवा करण्याची संधी देईल असा

**विठ्ठल परिवाराने दिला पाठिंबा तसेच मराठा समन्वयक रामभाऊ गायकवाड व कोळी समाजाच्या वतीने अभिजीत पाटीलाना दिला पाठिंबा**

विश्वास व्यक्त करत विरोधकांनी केलेल्या टीकेचा आपल्या शब्दात समाचार घेतला.

**मात्र हे सरकार आश्वासन देऊन देत आहे. त्यांना विचारा पहिल्या आश्वासनाचे काय झालं असा सवाल उपस्थित करत त्यांनी शेतकरी आत्महत्या, आरक्षण, महापुरुषांची स्मारके आणि पंधरा लाख रुपयाचं काय झालं असा सवाल उपस्थित केला. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील जनता हे सहन करणार नाही. हे लोकसभेच्या निवडणुकीला दाखवून दिले आहे. आताही झुकणार नाही असा विश्वास व्यक्त केला. ते पुढे बोलताना म्हणाले की माढ्याचा विकास अनेक वर्षांपासून झाला नाही यासाठी सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन जाणाऱ्या आणि माणसांना उभे करण्याचे काम अभिजीत पाटील यांनी केले आहे. माढ्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना निवडून द्या असे आवाहन केले.**

## थोडक्यात...

### अपघातात दुचाकीस्वार ठार

सोलापूर : अज्ञात चार चाकी वाहनाने पाठीमागून ठोकल्याने दुचाकीवरून घराकडे निघालेल्या इसमाचा मृत्यू झाला. या घटनेची हाकिकत अशी की,मयत अशोक इरांणा नागठाण (वय-६०,रा.भवानी पेठ सोलापूर) हे ६ जुलै रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास मार्केट यार्ड कडून मित्र नगरकडे दुचाकीवरून निघालेले असताना ज्वारी संशोधन केंद्राजवळ पाठीमागून आलेल्या अज्ञात चार चाकी वाहनाने त्यांच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालून नागठाण यांच्या दुचाकीस धडक दिली.या धडकेत नागठाण गंभीर जखमी झाले.त्यांच्यावर उपचार सुरू होते.उपचारादरम्य मृत्यू झाला.जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात अज्ञात चार चाकी वाहन चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक येडे हे करत आहेत.

### मतदानावेळी व्हीडीओ केल्यास गुन्हा होणार दाखल

सोलापूर : लोकशाहीच्या उत्सव शांततेत व निर्भय वातावरणात पार पडावा.यासाठी मतदानाला जाताना कोणालाही जवळ मोबाईल बाळगता येणार नाही. मोबाईल स्वतःजवळ ठेवून मतदान केले आणि त्यावेळचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केला किंवा मोबाईलच्या स्टेटसवर ठेवल्यास त्या व्यक्तीविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल केला जाणार आहे. विधानसभा निवडणुकी वेळी असा प्रकार घडू नये म्हणून केंद्राध्यक्षांना तसे निर्देश देण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीवेळी करमाळ्यातील एका मतदान केंद्रावर मतदान करताना एका व्यक्तीने ईव्हीएम वर हातोडा मारला होता.माढ्यातील एकामतदाराने कांद्याने ईव्हीएमचे बटन दाबले आणि तो व्हिडीओ सर्वत्र प्रसारित झाला होता. तर सांगोल्यातील एका मतदाराने पेट्रोल टाकून ईव्हीएमच जाळण्याचा प्रयत्न केला होता.हा अनुभव लक्षात घेऊन विधानसभा निवडणुकीत असे अनुचित प्रकार घडणार नाहीत,याची दक्षता घेतली जाणार आहे.मतदारांना मोबाईल घेऊन जाता येणार नाही आणि मोबाईल घेऊन गेलाच तर त्यांना मतदान करतानाच व्हिडीओ काढता येणार नाही.तसा प्रकार आढळल्यास त्या व्यक्तीविरुद्ध पोलिसांमार्फत कठोर कारवाई केली जाईल.

# राज्यात शरद पवार विरुद्ध मोदी अशी निवडणूक : आमदार रोहित पवार

**राज्यात महाविकास आघाडीचे १८० आमदार निवडून येथील : आमदार रोहित पवार, पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली माढ्याचा विकास करण्यासाठी साथ द्या : अभिजीत पाटील**

**स्वर्गीय यशवंतभाऊ, स्वर्गीय राजूभाऊ पाटील हे पवार साहेबांसोबत एकनिष्ठ राहिले : आमदार रोहित पवार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ मोडनिंब येथे आमदार रोहित पवार यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना आमदार रोहित पवार म्हणाले की सत्ताधारी सरकार महाराष्ट्राचे नाहीतर गुजरातच्या हिताचे काम करत आहे.

महाराष्ट्राचं भविष्य चांगलं राहिलं पाहिजे यासाठी पवार साहेब लढत आ-हेत. महाराष्ट्राच्या विधानसभेची निवडणूक पवार विरुद्ध मोदी अशी आहे.

भोसे ते फोनवरून रोहित पवार यांनी संपर्क जाहीर सभेत साधून म्हणले की पवार साहेब आणि भोसे गावचे वेगळे नातं आहे जेव्हा जेव्हा पवार साहेब पंढरपूर तालुक्याचा विषय घेतात तेव्हा आग्रह आग्रहाने भोसे गावाचा विषय सांगत असतात स्वर्गीय यशवंत भाऊ पाटील आणि कोरोनाच्या काळामध्ये स्वर्गीय राजू बापू पाटील यांचे दुःखद निधन झालं परंतु पवार साहेबांना सर्वजण सोडून जात होते त्यात मात्र पाटील परिवार नेहमी दोन पिढ्यापासून पवार साहेबांसोबत ताकतीने मागे उभा राहिला परंतु आजची पिढी ही भरकट चाललेली दिसत आहे त्यांना योग्य ती दिशा सांगितली तरी ऐकत नसली तरी येथील जनता त्यांना त्यांची जागा दाखवेल आणि येथील जनताच आद-रणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या सोबत ठामपणे उभा राहील असा विश्वास यावेळी व्यक्त केला.



ते पुढे बोलताना म्हणाले की येथील गर्दी पाहून या ठिकाणी पवार साहेबांनी जो उमेदवार दिला आहे. तो निवडून येईल असा विश्वास व्यक्त करत अभिजीत पाटील यांना पाठिंबा देणाऱ्या नेतेमंडळींचे आभार मानले. ते पुढे बोलताना म्हणा-ली की अभिजीत पाटील यांनी साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हितासाठी काम केले आहे. या मतदारसंघात उस आणि पाण्यावर राजकारण केले जात आहे. शेतकऱ्यांना अडचणीत आणले जात आहे.

**राज्यात महाविकास आघाडी सरकारला जनतेचे मोठे पाठबळ मिळत असल्याने महाविकास आघाडीचे १८० आमदार निवडून येतील आणि राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येईल असा विश्वास व्यक्त केला.**

यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून जायचे कारण नाही अभिजीत पाटील यांचा कारखाना तुमच्या मदतीला आहे. याचं बरोबर माझाहि कारखान्याच्या माध्यमातून अडचणी दूर केली जातील असा विश्वास देत.

येथील लोकप्रतिनिधी पवार साहेबांना सोडून भाजपाच्या मांडीला मांडी ला-वून बसले घड्याळाकडे गेले. मात्र घड्याळाची वेळ वाईट सुरू असल्याने त्यांनी त्यांचीही साथ सोडली.

उमेदवारी नाकारल्यानंतर ते पवार साहेबांवर बोलत आहेत. आम्ही खपवून घेणार नाही या शब्दात समाचार घेतला.

ते पुढे बोलताना म्हणाले की येथील जनतेकडून दोन्ही उमेदवाराची तुलना केली जात आहे. येथील शेतकऱ्यांच्या आणि अभिजीत पाटील यांच्या मागे शरद पवार आहेत. स्वतः पवार साहेबच उमेदवार आहेत असे समजून अभिजीत पाटील यांना निवडून द्या. असे आवाहन यावेळी रोहित पवार यांनी केले.

यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की पुढील काळात राज्यात पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. यामुळे मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी येथील जनतेने मला साथ द्यावी. असे आवाहन करत त्यांनी येथील लोक पवार साहेबांना सोडून गेले. त्यांना तिकीट नाकारल्यानंतर पवार साहेबांवर आरोप करत आहेत. विरोधकांकडे विकासाचे व्हिजन नाही. कोरोना काळात आर्थिक नुकसान करून नागरिकांसाठी काम केले. बंद पडलेला कारखाना सुरू करून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ दिले. मात्र समोरच्या उमेदवाराने दूध संघ बंद पाडला. दुधाचा भाव पाडला. त्याच्या जमिनी विकल्या, शेतकऱ्यांच्या उताऱ्यावर कर्ज काढून शेतकऱ्यांचे

**अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ भोसे आणि मोडनिंब येथे जाहीर सभा संपन्न**

नुकसान केले. म्हणून समोरचा उमेदवार गायब आहे. ही लढत आबा विरुद्ध दादा अशी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सीना माढा प्रकल्प बंद पडेल असे सांगितले जात आहे. मात्र मी आमदार झाल्यावर हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू करेन, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देईन, शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी मोडनिंब मार्केट कमिटीची सुधारणा करेन, मोडनिंब येथे एमआयडीसी उभारण्यात येईल, मोडनिंब येथे सर्व महापुरुषांची स्मारके उभारण्यात येईल असा विश्वास देत मी विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून काम करत आहे. ही निवडणूक आमदार पुत्राविरुद्ध शेतकऱ्यांचा मुलगा अशी आहे. यामुळे जनता दोघांचीही तु-लना करून मतदान करेल असा विश्वास व्यक्त केला.

## महात्मा बसवेश्वर स्मारकाची निर्मिती काँग्रेसमुळेच रखडली; डॉ. बसवराज बगले यांचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/प्रतिनिधी : बाराव्या शतकात सर्व प्रथम महात्मा बसवेश्वर यांनी लोकशाहीचा पाया रचून अनुभव मंडपाव्दारे म्हणुनच संसदेची निर्मिती केली. मंगळवेढ्यात जगतजोती महात्मा बसवेश्वरांचे राष्ट्रीय स्मारक निर्मितीसाठी कृती समितीने सतत पाठपुरावा केल्यामुळे राज्य सरकारने स्मारक समिती गठीत केली. परंतु काँग्रेसच्या नेत्यांनी विरोध केल्यामुळे ही समिती रदद झाली. त्यामुळे स्मारक निर्मितीचे काम रखडलेले आहे.

मंगळवेढा ही संतांची भूमी असून बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांची कर्मभुमी आहे. महात्मा बसवेश्वरांचे राष्ट्रीय स्मारक होण्यासाठी सबंध राज्यातुन मागणी होत असताना महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीच्या पुढाकाराने स्मारक कृती समितीचे अध्यक्ष डॉ. बसवराज बगले व अ‍ॅड. शिवानंद पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे समिती गठीत होण्याकरिता पाठपुरावा केला. समिती गठीत झाल्यानंतर समितीचे कामकाज सुरू होवुन कृष्ण तलाव या जागेचा प्रस्ताव व त्याचा पाठपुरावा चालू असताना व तसा प्रस्ताव प्रांत अधिकारी यांनी प्रस्ताव शासनाकडे पाठविला असताना या विषयाचे कामकाज प्रगतीपथा-वर असताना सदरची समिती रदद करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे अध्यक्ष आ. नाना पटोले यांनी पत्राव्दारे मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांच्याकडे केली. त्यानंतर सदरची समिती रदद झाली. स्मारक समिती रदद झाल्यामुळे याबाबत निधीची तरतूद अर्थमंत्री यांना करता आली नाही. वास्तविक महात्मा बसवेश्वरांचे राष्ट्रीय स्मारक मंगळवेढा या ठिकाणी होणार असल्याने एक चांगले पर्यटन केंद्र होवून शहराच्या व तालुक्याच्या विकासात भर पडणार होती. पण काँग्रेसचे नेते आ. नाना पटोले आणि स्थानिक नेत्यांनी विरोध केल्यामुळे समिती रदद झाल्यामुळे हे कार्य पुढे जावु शकले नाही. पंढरपूर-मंगळवेढयाचे आ. समाधान आवताडे यांनी स्मारक कृतीसमितीने त्यांची भेट घेतल्यानंतर

वेळोवेळी सकारात्मक भूमिका घेतली व हे काम पूर्णत्वास नेण्यासाठी मदत केली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांना भेटून स्मारकाचे काम तांत्रिक अडचणी दूर करून पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक पाठपुरावा केलेला आहे.

याऊलट काँग्रेस पक्षाकडून स्मारक होण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांनी विरोध केल्याचा कांगावा करत आहे आणि महाराष्ट्र शासन हे कार्य करण्यासाठी सक्षम असताना कर्नाटक सरकारकडे मदत मागत आहेत ही शरमेची बाब आहे.

याशिवाय महाराष्ट्रातील महयुती सरकारने महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती करून लिंगायत समाजातील तरूण तरूणींना व्यवसायासाठी कर्ज उप-लब्ध करून देण्याची तरतूद केली आहे आणि महात्मा बसवेश्वरांच्या स्मारकाबाबतीत व लिंगायत समाजाच्या प्रश्ना संदर्भात नेहमीच सकारात्मक राहीलेले आहेत. त्यामुळे हा विषय निवडणुकीनंतर गतिमान होणार आहे.

## कपडे बदलल्यासारखे नेते बदलत आहात त्यामुळे जनता आपल्या पाठीशी उभी आहे का याचे आत्मपरीक्षण करावे : बाबुराव गायकवाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तालुक्यातील दोन जणांनी काय केलं हे सर्वांना चांगले माहित आहे.साखर कारखान्याची वाट कोणी लावले ते सांगा असे म्हणत संस्था चालवण्याच्या आमच्यात हिंमत आहे.. विरोधकांनी संस्था काढून पिढी बरबाद करण्याचे काम करत आहात. समाजकारण करायचे असेल तर निरनिराळे चांगल्या संस्था उभ्या करा, शेतकऱ्यांच्या हिताचे राजकारण करा असे सांगत खऱ्याला खरे म्हणा लबाड्याच्या नादी लागू नका. कपडे बदलल्यासारखे नेते बदलत आहात त्यामुळे जनता आपल्या पाठीशी उभी आहे का असा सवाल उपस्थित करून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ.बाबासाहेब देशमुख यांना भरघोस मतांनी विजयी करा असे आवाहन शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते बाबुराव गायकवाड यांनी केले

महुद येथे डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ भव्य जाहीर सभा संपन्न झाली यावेळी व्यासपीठावर डॉक्टर बाबासाहेब देशमुख, डॉक्टर अनिकेत देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल पवार, दत्ता सावंत यांच्यासह शेतकरी कामगार पक्ष व मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी बोलताना अतुल पवार म्हणाले की, उजनी योजनेच्या पाईप आणले म्हणून तालुक्यात फटाके उडवता.. उजनीचे दोन एमसी पाणी दहा एमएम च्या पाईप मधून येत असते का असे सवाल उपस्थित करून काय बोलता..काय चालले हेच समजना. टेंभूच्या पाण्याचे काम चालू असताना उजनीचे सांगता लाजा वाटायला पाहिजेत अशी प्रस्थापितांवर जहरी टीका करत.लोकांची दिशाभूल करू नका असे आवाहन केले.येणाऱ्या कालावधीत तालुक्याचे विकासाचे काम करायचे आहे. गेल्या पाच वर्षात विकास कामांच्या ना-वाखाली नुसती डागडुजी केलेल्या कामे पुन्हा मजबूत करण्यासाठी डॉ. बाबासाहेब देशमुख यांना भरघोस मताने निवडून द्या असे आवाहन केले.

**महुद येथे डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा**

यावेळी बोलताना डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले की, आबासाहेबांनी तालुक्याच्या विकास करत असताना कोट्यावधींची विकास कामे आणली आणि ती चांगल्या पद्धतीने करूनही घेतले. ती कामे करून घेत असताना ठेकेदारांकडून कामानिमित्त आबासाहेबांनी चहा पिला असेल

असेल तर राजकारण सोडू. २३ तारखे नंतर तुमच्या केसालाही कोण धक्का लावणार नाही याची जबाबदारी मी आणि अनिकेतने घेतली आहे. महुद परिसरात गलाई बांधव व मोठे व्यापारी या ठिकाणी व्यापार करतात. टक्केवारी व हप्ता कुणाकडून घ्यावा हे समजत नाही. महूद सारख्या बाजारपेठेत हप्ता मागितला जातोय. किती खालच्या स्तराला यांचे राजकारण गेले आहे. याचा आता सर्वांना विचार करावा लागणार असून हे सर्व बंद करण्यासाठी शेकापच्या पाठीमागे खंबीरपणे उभे रहा असे आवाहन केले.

डॉ. अनिकेत देशमुख म्हणाले की, तुमच्याच नेत्यांनी आबासाहेबांच्या कार्याचे कौतुक केले आहे त्यामुळे टीका आमच्यापर्यंत मर्यादित असाव्यात. या पुढील काळात आबासाहेबांवर टीका केली तर ती तुम्ह-ाला झेपणार नाही. तालुक्याला एका विनोदी चष्म्यातून बघितले जाते. झाडी डोंगर पुरता सांगोला तालुका मर्यादित राहिला आहे. लोकशाहीला कलंक लावण्याचे काम लोकप्रतिनिधींनी केले आहे.या सर्व बाबींचा विचार निश्चितच २० तारखेला केला जाईल आणि २३ तारखेला शेतकरी कामगार पक्षाचा झेंडा या तालुक्यात पुन्हा एकदा डौलाने फडकवले असा विश्वास व्यक्त केला.

प्रारंभी महूद गावा-तून डॉक्टर बाबासाहेब देशमुख डॉक्टर अनिकेत देशमुख यांची जंगी मिरवणूक करण्यात आली होती. यावेळी शेतकरी कामगार पक्ष व मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आज पर्यंतच्या इतिहासातील महुद येथील सर्वात मोठी रॅली झाली असून महुद गटातून शेकापला निश्चित मताधिक्य मिळेल असा विश्वासही कार्यकर्त्यांमधून व्यक्त केला जात आहे.

**भावाला प्रचंड मताधिक्याने निवडून आणणार बहिणींचा निर्धार**

**महिला - भगिनी यांच्या भावना**

# सांगोल्यात लाडक्या बहिणींचा मोठा पाठिंबा; डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्यासाठी स्त्री शक्ती एकवटली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारण रंगले आहे. बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान तर शनिवार दि.२३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे प्रचाराचा धुराळा उडाला आहे. आता सांगोल्यात सांगोला विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी-इंडिया अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब आण्णासाहेब देशमुख यांच्या प्रचारासाठी महिला शक्ती एकवटली आहे. येऊन येऊन येणार कोण ? आमच्या लाडक्या भावाशिवाय आ-हेच कोण....डॉ.बाबासाहेब देशमुख तुम आगे बढों हम तुम्हारे साथ है! अशा घो-षणा देण्यात आल्या. महिला भगिनींच्या या घोषणांनी सांगोला शहरासह ग्रामीण भाग अक्षरशः दुमदुमून गेला होता.

**प्रचारादरम्यान सांगोला विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गावामध्ये डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या स्वागतासाठी महिला भगिनी मोठ्या संख्येने औक्षण करण्यासाठी जमत आहेत.तसेच सांगोला तालुक्यातील डॉ.निकीताताई देशमुख याही डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचारानिमित्त तालुक्यात फिरत आहेत. यावेळी डॉ.निकीताताई देशमुख यांचेसोबत महिला भगिनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. सांगोला तालुक्याच्या विकासासाठी रात्र झटणार्‍या या आमच्या भावासाठी आम्ही पूर्ण ताकतीने उभे राहणार असल्याचा संकल्प या महिला भगिनींनी व्यक्त केला.**

गेल्या तीन वर्षापासून सांगोला तालुक्यासाठी दिवस रात्र झटणार्‍या या आमच्या भावाला ऐन निवडणुकीच्या तोंडावर या सांगोला तालुक्यातील काही स्वार्थी लोकांनी एकटे पाडण्याचा प्रयत्न केला आहे.



मात्र या तालुक्यातील तमाम माता, भगिनी डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचे काम करणार असल्याच्या भावना महिला भगिनी व्यक्त करत होत्या.

## जीवे मारण्याची धमकी, गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) माझ्यासोबत मैत्री ठेवली नाही तर तोंडावर ॲसिड फेकून जीव मारीन अशी धमकी दिल्याप्रकरणी मुंबईच्या तरुणावर विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेची हकीकत अशी की,एका महिलेच्या आ-ओळखीचा मित्र संशयित आरोपी योगेश सूर्यकांत कदम (वय-३०,रा.दादर कीर्ती कॉलेज शेजारी,मुंबई) हा १६ नोव्हेंबर रोजी सोलापुरातील कल्याण नगर येथे आला.त्यावेळी त्याने फिर्यादी महिला यांच्याबरोबर वाद घालून तसेच चारित्र्यावर संशय घेत हातातून मोबाईल हिसकावून घेतला.आणि माझ्यासोबत मैत्री ठेवली नाही तर तोंडावर ॲसिड फेकून मारण्याची धमकी दिली.विजापूर नाका पोलीस ठाण्यात योगेश कदमवर गुन्हा दाखल झाला असून तपास साह. पोलीस निरीक्षक पोपळघट हे करत आहेत.